संचालनालय लेखा व कोषागार
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
16 OCT 2026
प्राप्त झाले सही........................

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, उपसंचालक संवर्गातील श्री. निलेश मुरलीधर नलावडे यांच्या बदलीबाबत...

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन आदेश क्रमांक:-संलेको-२०२६/प्र.क्र.१५६(ई-१८२८९४८)/कोषा. प्रशा-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६.१०.२०२६

**शासन आदेश**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) व ४ (५) मधील तरतूदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाराच्या मान्यतेने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, उपसंचालक संवर्गातील खालील विवरणपत्रात नमूद अधिकाऱ्याची स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या पदावर त्या पदाची वेतनश्रेणी तात्पुरत्या स्वरुपात अवनत करुन पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ.क्र | अधिकाऱ्यांचे नाव | सध्याचे पदनाम व कार्यालय | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | श्री. निलेश मुरलीधर नलावडे | वित्त तज्ञ (उपसंचालक), महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-"मित्र" | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |

२. श्री. नलावडे यांनी बदलीच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच, संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

४. श्री. नलावडे यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशील HRMS मधील नमून्यात भरून नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच, संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RUPALI SANJOG KABARE

**(रुपाली कबरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सहसचिव, मा. मुख्यमंत्री तथा मा. मंत्री (वित्त) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर, *
३. संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई,

४. संचालक, संचालनालय, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई, *
५. संबंधित अधिकारी यांचे सध्याच्या पदाचे कार्यालय प्रमुख,*
६. संबंधित अधिकारी यांचे नवीन पदस्थापनेच्या पदाचे कार्यालय प्रमुख,*
७. श्री. निलेश मुरलीधर नलावडे, उप संचालक *
८. निवडनस्ती/कोषा.प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(*संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)